# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/04/2023 (मंगळवार) सकाळ


## अवैध्य मोहाफुल रसायण साठयावर
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक ११/०४/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अरोली हद्दीतील सिरसोली येथे अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना मुखबीर कडुन मिळालेल्या माहिती वरून सिरसोली येथे मोहाफुल गावठी भट्टीवर रेड केली असता **आरोपी नामे— ग्यानी राम लहानुजी कारेमोरे, वय ४४ वर्ष, रा. सिरसोली ता. मौदा जि. नागपूर** या नावाचा इसम दगड विटाच्या चुलीवर अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची भट्टी तयार करून दारू गाळत असल्याबाबत गोपनिय बातमी मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण येथील स्टाफने नमुद घटनास्थळी अवैध मोहाफुल दारू भट्टीवर छापा मारून त्याचे ताब्यातुन १) ७५० मोहाफुल सडवा किंमती अंदाजे ३७५००/—रू. २) १० लीटर मोहाफुल दारू किंमती अंदाजे १०००/—रू. ३) मोहाफुल दारू गाळण्याचे इतर साहित्य किंमती अंदाजे १३००/—रू. असा एकुण किंमती अंदाजे ३९८००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे अरोली येथे अप क्र. ८७/२०२३ कलम ६५ (ई) (क) (फ) (ब) मदाका. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, रोशन काळे, पोलीस नायक रोहन डाखोरे, विपीन गायधने, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे यांचे पथकाने केली.



# घरफोडी

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा रिंगनाबोडी शिवार गायत्री ब्रम्हा मंदीर येथे दिनांक १०/०४/२०२३ चे ०२.३० वा. सुमारास यातील **आरोपी नामे– १) जितेंद्र तूळशीराम बिसेन, वय २१ वर्ष, रा. प्लॉट नं ६ गूरूदेव ले आउट हूडकेश्वर नागपूर २) चंद्रभान रामप्रसाद उइके, वय २० वर्ष, रा. प्लॉट नं १०६ मित्रनगर मानेवाडा रोड नागपूर** या आरोपीतांनी संगनमत करून नमूद घटनास्थळावरील गायत्री मंदीराचे कूलूप तोडून घरफोडी करण्याचा प्रयत्न केला. नमूद फिर्यादी नामे– दिपक रामकूमार बसनेत, वय ३५ वर्ष, रा. रिंगनाबोडी ता. काटोल जि. नागपूर व त्यांचे साथीदारांनी आरोपीस पकडून पोलीसांच्या स्वाधिन केले आरोपींच्या ताब्यातून पल्सर मोटरसायकल किंमती अंदाजे ६००००/– रू. जप्त करण्यात आली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा राठोड ब. नं. २०४८ मो नं ९८६०४२७९०२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**